**ठळक बातम्या**

- नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांविरुद्ध ईडीकडून आरोपपत्र दाखल
- भारत आणि अमेरिका यांच्यात द्विपक्षीय व्यापार कराराचा पहिला टप्पा सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्यावर सहमती
- अमेरिकेनं अतिरीक्त आयात शुल्काला स्थगिती दिल्यानं सलग दुसऱ्या सत्रात शेअर बाजारात जोरदार तेजी

**आणि**

- यंदा जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीपेक्षा ५ टक्के अधिक पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी सक्तवसुली संचालनालयानं मनी लाँड्रिंगच्या आरोपाखाली काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांविरुद्ध आरोपपत्र दाखल केलं आहे. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी या आरोपपत्राची तपासणी केली आणि पुढची प्रक्रिया येत्या २५ तारखेला होईल, असं सांगितलं. आरोपपत्रातल्या इतर नावांमधे काँग्रेस नेते सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

काँग्रेस नेता प्रियांका गांधी यांचे पती रॉबर्ट वाडरा यांच्या हरियाणातल्या जमीन घोटाळ्यातल्या सहभागाबद्दल सक्तवसुली संचालनालयामार्फत चौकशी झाली. वाडरा यांच्या कंपनीने गुरुग्राम इथं केलेल्या जमीन खरेदीचा

या खटल्याशी संबंध आहे. नवी दिल्लीतल्या संचालनालयाच्या कार्यालयात वाडरा आज सकाळी चौकशीसाठी हजर झाले होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज डेन्मार्कचे प्रधानमंत्री मेट फ्रेडरिक्सन यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. दोन्ही देशात विविध क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावर दोन्ही नेत्यांमधे यावेळी सहमती झाली. फ्रेडरिक्सन यांच्याशी विविध प्रादेशिक आणि जागतिक विषयांवर चर्चा झाल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे सांगितलं.

पुढच्या वर्षी नॉर्वे मधे होणाऱ्या तिसऱ्या भारत-नॉर्डिक परिषदेची आणि तिथं प्रधानमंत्री फ्रेडरिक्सन यांच्या भेटीची आपल्याला उत्सुकता असल्याचं मोदी म्हणाले.

**<><><><><>**

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी राज्यपालांनी प्रधानमंत्र्यांशी महाराष्ट्राच्या विकासासह विविध विषयांवर चर्चा केली.

**<><><><><>**

राजस्थान राज्य सरकारमधले माजी मंत्री प्रताप सिंह खचरियावास यांच्या निवासस्थानासह इतर १५ ठिकाणी आज सक्त वसुली संचालनालयाने छापे टाकले. PACL शी संबंधित ४८ हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी तपास करण्यासाठी हे छापे टाकण्यात आले आहेत. कंपनीच्या मालमत्तेची बेकायदेशीर विल्हेवाट लावल्याबद्दल दिवंगत निर्मल सिंह भांगु यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><><>

महसूल गुप्तचर विभागानं नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका व्यक्तीला अटक करुन साडेसात किलोपेक्षा जास्त कोकेन जप्त केलं. अंमली पदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत काल दुबईवरुन आलेल्या या प्रवाशाची झडती घेतली असता त्याच्याकडे हे कोकेन आढळलं. बाजारात त्याचं मूल्य ७५ कोटी रुपयांहून अधिक आहे.
या कोकेनचा स्रोत, आणि यामागे एखादं तस्करीजाळं आहे का, याचा शोध घेण्यासाठी महसूल गुप्तचर संचालनालय अधिक तपास करत आहे.

<><><><><>

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट म्हणजेच वेव्हज परिषद ही जागतिक मनोरंजन परिसंस्थेतले व्यावसायिक, व्यवसाय आणि निर्मात्यांना जोडण्यासाठी उचललेलं क्रांतिकारी पाऊल असल्याचं प्रतिपादन अभिनेता आमीर खान याने एका इंग्रजी दैनिकाशी बोलताना केलं आहे. मनोरंजन क्षेत्रातले व्यावसायिक यांना व्याप्ती वाढवण्याच्या दृष्टिकोनातून तसंच नवीन संधींच्या शोधात असलेल्यांना यात सहभागी होता येत आहे. त्यामुळे वेव्हज बाजार हा माध्यम आणि मनोरंजन उद्योगांसाठी व्यवसायवाढीचं केंद्र बनल्याचं आमीर खान याने म्हटलं आहे.

<><><><><>

क्रिएट इन इंडिया अंतर्गत होणाऱ्या वेव्हजचा भाग म्हणून ॲनिमेशन, कॉमिक्स आणि डिजिटल व्हर्टिकल स्टोरीटेलिंग स्पर्धा आज बंगळुरू झाली. यात जपानी शैलीतलं ॲनिमेशन, कॉमिक्स, वेबटून्स, कॉश्चूम परफॉर्मन्स आणि व्हॉईस ॲक्टिंग असे पाच प्रकार होते. या स्पर्धेत १२१हून अधिक

स्पर्धकांनी पात्रता फेरीसाठी नोंदणी केली आहे. अंतिम फेरीत पोहोचणाऱ्या स्पर्धकांना मुंबईत होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. या स्पर्धेतल्या विजेत्यांना टोकियो इथे होणाऱ्या ॲनिमे जपान २०२६ या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिका द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यातल्या चर्चा सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचा दोन्ही देशांचा मानस आहे. या आठवड्यात दोन्ही देशांमध्ये या कराराविषयी चर्चा होईल आणि पहिल्या टप्प्यासाठीचे निकष ठरवले जातील, अशी माहिती वाणिज्य आणि उद्योग सचिव सुनिल बर्थवाल यांनी दिली. अमेरिकेचं सध्याचं अतिरीक्त आयात शुल्क हे भारतासाठी आव्हानात्मक तसंच संधी उपलब्ध करुन देणारंही असल्याचं ते म्हणाले. भारतानं व्यापार उदारीकरण आणि अमेरिकेसोबत द्विपक्षीय करार करायचा निर्णय आहे. यामुळं दोन्ही देशांसाठी मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होतील, असं ते म्हणाले. दोन्ही देशातला व्यापार २०३० पर्यंत ५०० अब्ज डॉलरपर्यंत जाईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

अमेरिकेनं अतिरीक्त आयात शुल्क लादण्याच्या निर्णयाला स्थगिती दिल्यामुळं आजही देशातले शेअर बाजार जोरदार तेजीत होते. सेन्सेक्स आज तब्बल १ हजार ५७८ अंकांनी वधारुन ७६ हजार ७३५ अंकांवर बंद झाला. निफ्टी ५०० अंकांची वाढ नोंदवून २३ हजार ३२९ अंकांवर बंद झाला. यामुळं गुंतवणूकदारांची मालमत्ता सुमारे ११ लाख कोटी रुपयांनी वाढली. गेल्या २ सत्रात सेन्सेक्स सुमारे २ हजार ९०० आणि निफ्टी १

हजार अंकांनी वधारला आहे. दोन्ही निर्देशांक सध्या १५ दिवसातल्या उच्चांकी पातळीवर आहेत.

**<><><><>**

आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरीची वाट चालणारी वारी, दिंडी आपल्या चांगलीच परिचयाची आहे. मात्र आता ही दिंडी देशाच्या सीमा ओलांडून सातासमुद्रापार जाऊ पाहते आहे. अधिक जाणून घेऊ या आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड... व्हीसी-**

*महाराष्ट्रातल्या संतांनी समाजाला दिलेला संदेश जगात सर्वदूर पोहोचावा, या उद्देशानं पंढरपूर ते लंडन अशी विठुरायाची दिंडी काल रवाना झाली. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात विठ्ठलाच्या प्रतिकात्मक पादुकांची विधिवत पूजा करून दिंडीनं लंडनच्या दिशेनं प्रस्थान ठेवलं. मूळचे अहिल्यानगरचे आणि लंडनमध्ये स्थायिक झालेले अनिल खेडकर यांनी या दिंडीचं आयोजन केलं आहे. ब्रिटनच्या मराठी मंडळाच्या वतीनं लंडनमध्ये विठ्ठल-रुक्मिणी मंदिर उभारण्यात येणार आहे. त्या कामाला सुरुवात करण्यापूर्वी ही दिंडी २२ देशांमधून १८ हजार किलोमीटरचा प्रवास ७० दिवसांत करून २१ जून रोजी लंडनला पोहोचेल.*

*सोलापूरहून महेश पांढरे यांच्यासह आकाशवाणी बातम्यांसाठी मी अंकिता आपटे.*

**<><><><>**

यंदाच्या अमरनाथ यात्रेसाठी जम्मू काश्मीरमधे आजपासून नोंदणी सुरु झाली. श्री अमरनाथजी श्राईन बोर्डाच्या संकेतस्थळावरुन नोंदणीला कालच

सुरुवात झाली. देशभरातल्या निवडक ५४० बँकशाखांमधेही यात्रेसाठी नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यात्रेसाठी नोंदणी करणं अनिवार्य आहे. प्रतिदिन केवळ १५ हजार यात्रेकरुंना परवानगी असेल. अनंतनाग जिल्ह्यातल्या पहलगाम मार्गे आणि गंदेरबाल जिल्ह्यातल्या बालताल मार्गावरुन यात्रा येत्या ३ जुलै पासून सुरु होईल.
५२ दिवस चालणारी ही यात्रा रक्षाबंधनाच्या दिवशी येत्या ९ ऑगस्टला समाप्त होईल. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी गेल्या ५ मार्चला यात्रेचा कार्यक्रम जाहीर केला होता.
उत्तराखंडमधल्या चारधाम यात्रेसाठी देखील आजपासून नोंदणी सुरु झाली आहे.

**<><><><><>**

भारतातून हज यात्रेला जाणाऱ्यांचा कोटा वाढवून आता १ लाख ७५ हजार केला असल्याची माहिती केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्रालयाने दिली आहे. हा कोटा २०१४ पासून १ लाख ३६ हजार यात्रेकरूंचा होता. मंत्रालयाने हज कमिटीमार्फत १ लाख २२ हजार यात्रेकरूंच्या विमान तिकीटांची आणि इतर व्यवस्था सौदी अरेबियाच्या नियमांप्रमाणे केली असून उरलेल्या यात्रेकरूंची व्यवस्था खाजगी यात्रा कंपन्यांकडे सोपवली असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

यंदा जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीच्या ५ टक्के अधिक पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉक्टर मृत्यूंजय मोहपात्रा यांनी नवी दिल्ली इथं

पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावर्षी पाऊस सरासरीच्या १०५ टक्के होण्याचा अंदाज आहे. देशातल्या अनेक भागात सामान्य ते सामान्यापेक्षा अधिक पाऊस पडेल, तसंच ईशान्य आणि वायव्य भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

सुदानमधे दुष्काळग्रस्तांच्या संक्रमण शिबिरावर बंडखोरानी केलेल्या हल्ल्यात ३०० हून जास्त नागरिकांचा मृत्यू झाल्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनी चिंता व्यक्त केली आहे. झमझम शिबिरावर झालेल्या हल्ल्यामधे किमान २३ लहान मुलं आणि स्वयंसेवी संघटनांचे किमान १० कार्यकर्ते मारले गेले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चंदीगढ इथं पंजाब सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट राईडर्स यांच्यात सामना सुरु आहे. पंजाब सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या ८ षटकात ४ बाद ६६ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**